# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
## ४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.

फॅक्स २५६५६२३४ Email : ropune.dte@gmail.com Web Site : - www.ropune.org.in


जा. क्र. तंशिविकापु/विवि/शै. कर्ज व्याज माफी योजना/२०१०-११/ 2602 दिनांक 20 APR 2011

प्रति,

प्राचार्य/संचालक,
सर्व शासकीय/शासकीय अनुदानित/विनाअनुदानित खाजगी तांत्रिक/व्यावसायिक पदवी/पदविका महाविद्यालये/
पदव्युत्तर पदवी एमबीए/एमसीए

विषय :- Interest Subsidy on Education Loan या योजनांच्या अंमलबजावणीबाबत.

संदर्भ :- मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. २/एनजीसी/शै. कर्ज व्याज माफी योजना/२०११/२९५०/दिनांक ३०/०३/२०११.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यांत येते की, केंद्र शासनाने इंडियन बँक असोसिएश्ंन मार्फत शैक्षणिक कर्जाकरील व्याज माफीची योजना शैक्षणिक वर्ष २००९-१० पासून अंमलात आणले आहे.

सदरहू योजना ही केंद्र शासनाने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन तयार केलेली आहे. निधीअभावी कोणताहि गुणवत्ताधारक विद्यार्थी तांत्रिक तसेच व्यावसायिक शिक्षणापासून वंचित रांहू नये, यासाठी सदरहू योजना केंद्र शासनाने सुरु केली आहे. सदरहू योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी इंडियन बँक असोसिएशन, कॅनरा बँक (नोडल बँक ) आणि राज्य शांसन कटिबध्द आहेत.

ज्या विद्यार्थ्यांचे कौटुंबिक उत्पन्न ४.५० लक्ष रुपयांचे आंत आहे. व जे विद्यार्थी शांसनाची इतर कोणतीही सवलत घेत नाहीत, असे विद्यार्थी सदर योजनेस पात्र राहतील तसेच अशां विद्यार्थ्यांनी उत्पनाचे प्रमाणपत्र सक्षम अधिकारी (तहसिलदार) यांचेकडून प्राप्त करुन घेतलेले असले पाहिजे.

हया योजनेच्या अधिक माहिती करीता विद्यार्थ्यांनी /पालकांनी इंडियन बँक असोसिएश्ंन, कॅनरा बँक अथवा महाराष्ट्र बँक यांचेशी संपर्क साधांवा. ज्या महाविद्यालयात अशा योजनेचा लाभ घेणारे विद्यार्थी असतील त्यांनी सदरची माहिती विहित नमुन्यात भरुन या कार्यालयास ई मेल द्वारे त्वरीत पाठवावी.

(डी. एन. शिंगाडे)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.